प्रेस नोट दिनांक -२१/०६/२०१९

## प्रियकराच्या मदतीने पतीचा खुन करणा-या आरोपीतांना चोवीस तासाच्या आत हडपसर पोलीसांकडुन अटक

पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास व शरीराविरोधाच्या आळा बसविण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

एक अनोळखी इसम बेशुध्द अवस्थेत पडलेला आहे असा पोलीस नियत्रंण कक्षा कडील कॉल प्राप्त झाल्याने पोलीसांनी सदर ठिकाणी जावुन सदरच्या बेशुध्द इसमास ससुन हॉस्पीटल येथे उपचारकामी दाखल केले. तेंव्हा सदर इसम हा डॉक्टर तपासणीपुर्वी मयत झाल्याचे समजले. त्यांनतर सदर मयत बॉडी ताब्यात घेवुन पोस्टमार्टेम करण्याकरीता डेड हाऊस ससुन हॉस्पीटल पुणे येथे नेवुन त्याचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मयताचे पोस्टमार्टेम झाल्यानंतर सदर इसमाचा मृत्यु मारहाणी मुळे झाल्याबाबत निष्पन्न झाल्याने सदरचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याचे निदर्शनास आल्याने स.पो.नि. दिलीप गाडे यांनी हडपसर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला. मा. रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांनी समक्ष घटनास्थळी भेट देवुन तपासी अंमलदार व तपास पथकातील अधिकारी यांना तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर तपास पथकातील अधिकारी स.पो.नि. संजय चव्हाण व तपास पथकातील कर्मचारी यांनी मयत अनोळखी इसमाचे अंगावर मिळुन आलेल्या सिक्युरिटी गार्डचा बेल्ट नुसार हडपसर परिसरातील सिक्युरिटी गार्ड ऐजन्सी तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरात अनोळखी इसमाच्या नातेवाईकाचा शोध घेत असताना पो.शि. शेख व पो.शि. नाळे यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर अनोळखी मयत इसमाचे नाव प्रकाश शंकरराव विलायतकार, रा. त्रिमुर्ती रिक्षा स्टॅन्ड जवळ फुरसुंगी पुणे असे असल्याची माहिती प्राप्त झाली.

त्यानंतर गुन्हयाचे तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे व हडपसर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी सपोनि संजय चव्हाण, प्रसाद लोणारे व कर्मचारी यांनी मयत इसमाची पत्नी, त्यांचे संबंधीत नातेवाईक, सोबत काम करणारे कामगार, आजुबाजुस राहणाऱ्या व्यक्ती, यांचेकडे अंत्यंत बारकाईने व कौशल्यपुर्ण तपास करुन आणि गोपनीय बातमीदार यांचा तसेच गुन्हयाची उकल करण्याकरीता तांत्रिक विश्लेषणाचा बारकाईने वापर करुन दिनांक २१/०६/२०१९ रोजी खालील दोन आरोपीतांना दाखल गुन्हयात अटक केली.

१) सौ. सरिता प्रकाश विलायतकर वय ३४ वर्षे रा. त्रिमुर्ती रिक्षा स्टॅन्ड जवळ फुरसुंगी पुणे, मुळगाव इरथळ ता. दारवा जि. यवतमाळ.
२) तारकेश तानाजी रणधीर वय २५ वर्षे रा. स. नं. २१५, अष्टविनायक कॉलनी गंगानगर फुरसुंगी पुणे

वरील अटक महिला आरोपी ही मयताचे पत्नी असुन तिचे आणि अटक आरोपी तारकेश तानाजी रणधीर याचे प्रेंमसंबंध असल्याचे मयत इसम प्रकाश विलायतकर यांना माहिती झाल्याने तो महिला आरोपी हिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला वारंवार मारहाण करीत होता. तो त्रास बंद करण्याकरीता आणि आरोपीतांच्या जुन्या प्रेमसंबंधात अडचण निर्माण होवु लागल्याने मयताची पत्नी व त्याचे प्रियकर आरोपी तारकेश रणधीर यांनी काटा काढण्याचे ठरवुन आरोपी तारकेश रणधीर याने त्याचे मित्रासह मयत प्रकाश विलायतकर यास मारहाण करुन जीवे ठार मारुन कॅनॉल लगत असलेल्या मातीच्या ढिगाऱ्याच्या बाजुला टाकले होते. हडपसर पोलीस स्टेशनकडील आधिकारी यांनी केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामुळे केवळ २४ तासाच्या आत गुंतागुंतीचा गुन्हयांची उकल करुन दोन आरोपींताना जेरबंद करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. शशीकात शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो, उत्तर प्रादेशिक विभाग पुणे, मा. सुनिल फुलारी, मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त , परिमंडळ ५ पुणे शहर व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा. रघुनाथ जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस ठाणे पुणे, यांचे सुचनानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे,सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक, किरण लोंढे सहा. पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, माणिक डोके पोलीस उप निरीक्षक, पो हवा. युसुफ पठाण, पो. हवा. रमेश साबळे पो. हवा. राजेश नवले, पो हवा शंकर नेवसे, पो हवा संपत औचरे, पो. ना. प्रताप गायकवाड, पो. ना. सैदोबा भोजराव, पो. ना. विनोद शिवले, पो ना गणेश दळवी पोशि अनिल कुसाळकर पो. शि. अकबर शेख, पो. शि. शंशीकांत नाळे, पो. शि. गोविंद चिवळे, पो. शि. अमित कांबळे, पो. शि. ज्ञानेश्वर चित्ते ,मपोशि स्वप्नाली आंमले यांनी यांनी केली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक गुन्हे हे करीत आहेत.